INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES



ISSN 2277 – 9809 (online)
ISSN 2348 - 9359 (Print)

An Internationally Indexed Peer Reviewed & Refereed Journal

www.IRJMSH.com
www.isarasolutions.com

Published by iSaRa Solutions

भारतीय संविधान लागू झाल्यानंतरचा भारत

प्रा. डॉ. सौ. अरुणा रविंद्र वाघोले.

इतिहासविभाग प्रमुख,

मा.बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालय, आळे. ता- जुन्नर, जि- पुणे

aruna.123w@gmail.com

प्रास्ताविक-

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. भारतीयांचे अनेक वर्षांचे स्वप्न साकार झाले. देशात सर्वत्र आनंदाचे उधान झाले. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्राचा दर्जा प्राप्त झाला. नव्यानेच स्वतंत्र झालेल्या भारतासमोर अनेक प्रकारच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. या समस्यांचे निराकरण करणे ही भारतासमोर गंभीर समस्या होती. त्याशिवाय स्वातंत्र्य प्राप्तीला अर्थ प्राप्त होणार नव्हता. भारताने सर्व समस्या यशस्वीरित्या सोडवल्या आणि प्रगतीच्या दिशेने घोडदौड सुरू केली. विकासाच्या अनेक अवस्था पार केल्या. कोणकोणत्या समस्या होत्या ते पाहणे आवश्यक आहे.

भारताच्या समस्या-

१) स्वतंत्र भारतासाठी संविधान तयार करणे.
२) संस्थानांचे संघराज्यात विलीनीकरण करणे.
३) निर्वासितांचे पुनर्वसन करणे.
४) भाषावार प्रांतांची पुनर्रचना करणे.
५) भारताच्या आर्थिक विकासाचे धोरण निश्चित करणे[१]

वरील सर्व समस्या भारताने यशस्वीरित्या सोडवल्या.

संविधान निर्मिती

स्वतंत्र भारतीय संघराज्याचे संविधान करणे ही भारतासमोर महत्त्वाची समस्या होती. संविधान तयार करण्यासाठी घटना समिती गठीत करण्याची आवश्यकता होती. त्रिमंत्री योजनेतील तरतुदीनुसार घटना समिती गठित करण्यासाठी जुलै १९४६ मध्ये निवडणुका घेण्यात आल्या. २९६ सदस्यांची निवड करून घटना समिती गठित करण्यात आली. या समितीमध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना अबुल कलाम आझाद यांच्यासारख्या राष्ट्रीय सभेच्या नेत्यांचा समावेश होता, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बॅ. जयकर, कन्हैयालाल मुन्शी यासारखे कायदेतज्ञ होते, तसेच राजकुमारी अमृता कौर, हंसाबेन मेहता, सरोजिनी नायडू इ. सारख्या नामांकित सात महिला सदस्य होत्या.[२] मुस्लिम व शीख समुदायाचे प्रतिनिधी समितीत होते. घटना समितीने वेगवेगळ्या कामकाजासाठी ११ उपसमित्या बनविल्या होत्या. घटना समितीच्या सदस्यांनी कठोर परिश्रम घेऊन भारताची राज्यघटना तयार केली.

राज्यघटना कशी तयार झाली?

"राज्यघटना म्हणजे कोणत्याही देशाच्या शासनव्यवस्थेची मूलभूत वैचारिक बैठक स्पष्ट करणारी तसेच शासनसंस्थेचे अधिकार आणि जनतेचे हक्क स्पष्ट करणारी नियमावली म्हणजे राज्यघटना होय."[३] भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी एक मसुदा समिती तयार करण्यात आली होती.

घटना समितीचे स्वरूप-

राज्यघटनेचा आराखडा (मसुदा) तयार करण्यासाठी जी मसुदा समिती बनवली होती, तिचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यामध्ये अल्हादी कृष्णा स्वामी अय्यर, डॉ. कन्हैयालाल मुन्शी, एन गोपाल स्वामी अय्यंगर, सईद मोहम्मद सादुल्ला इ. कायदे पंडितांचा समावेश होता. याच समितीने कठोर परिश्रम घेऊन भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार केला.

घटना समितीचे कामकाज-

घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी दिल्ली येथे झाली. या बैठकीस २९७ सदस्य उपस्थित होते. डॉ.सच्चिदानंद सिन्हा यांची तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. ११ डिसेंबर रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची स्थायी अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १३ डिसेंबर १९४६ रोजी भारतीय राज्यघटनेची उद्दिष्टे स्पष्ट करणारा उद्दिष्टे ठराव मांडला. त्यात राज्यघटनेची उद्दिष्टे काय राहतील हे निर्देशित करण्यात आले. अशा प्रकारे घटना समितीचे कामकाज सुरू झाले. घटना समितीची एकूण ११ सत्रे झाली त्यास १०८२ दिवसांचा म्हणजे २ वर्ष, ११ महिने, १८ दिवसांचा कालावधी लागला. २६ जानेवारी १९४९ रोजी मसुदा समितीने तयार केलेला भारतीय संविधानाचा मसुदा घटना समितीने स्वीकारला. २६ जानेवारी १९५० पासून भारतीय संविधान भारतीय संघराज्यासाठी लागू करण्यात आले.[४]

संविधान सरनामा म्हणजे काय?

कोणत्याही कायद्याच्या प्रारंभिक कायद्याचे उद्दिष्ट स्पष्ट करणारे प्रास्ताविक असते, त्यास सरनामा म्हणतात. भारतीय संविधान भारतीय संघराज्याचा कायदा आहे. त्याचे उद्दिष्टे सुरुवातीला स्पष्ट करण्यात आलेली आहेत. उद्दिष्टे स्पष्ट करणाऱ्या प्रास्ताविकास संविधान सरनामा म्हणतात. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे-

- **सरनाम्याचे स्वरूप-**

  संविधानाच्या प्रास्ताविकात असे घोषित करण्यात आले की, सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक भारत आपल्या नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, न्याय, आचार, विचार, धर्म, स्वातंत्र्य, समान दर्जा, समान संधी उपलब्ध करून देण्याची ग्वाही देत आहे. राष्ट्राचे ऐक्य व व्यक्तीची प्रतिष्ठा याबाबत हमी देऊन त्यांच्यात बंधुभाव वाढीस लागावा यासाठी घटना समिती ही घटना संमत करीत आहे.[५]

- **संविधानाचे स्वरूप-**

१९३५ चा कायदा भारतीय राज्यघटनेचा मूलभूत आधार आहे. या कायद्यातील अनेक तरतुदींचा राज्यघटनेत समावेश करण्यात आलेला आहे. नेहरू रिपोर्ट मधील काही शिफारशींचा घटनेत समावेश केलेला आहे भारतीय संघराज्य व घटक राज्य यांनी वेळोवेळी कोणकोणत्या धोरणांचा अवलंब करावा याविषयी मार्गदर्शक तत्वे घटनेत आहेत

राज्यघटनेत २२ भाग असून ३९५ कलमे आहेत. विविध विषयांसंबंधी १० परिशिष्टे त्यास जोडलेली आहेत. भारतीय घटनेचा गोषवारा संक्षिप्तपणे पुढील प्रमाणे देता येईल-

भाग	कलमे	तपशील
१	१ ते ४	प्रदेश, सीमा इत्यादी संबंधी
२	५ ते ११	नागरिकत्वा संबंधी
३	१२ ते ३५	मूलभूत हक्का संबंधी
४	३६ ते ५१	मार्गदर्शक तत्वे
४ अ	५१ अ	मूलभूत कर्तव्ये
५	५२ ते १५१	केंद्र सरकारचे कामकाज
६	१५२ ते २३७	राज्य सरकारांचे कामकाज
७	२३८	सातव्या घटना दुरुस्तीने रद्द (१९५६)
८	२३९ ते २४१	केंद्र शासित प्रदेशांचे प्रशासन
९	२४२ ते २४३	सातव्या घटना दुरुस्तीने रद्द (१९५६)
१०	२४४ - २४४ अ	वर्गीकृत व आदिवासी प्रदेशा संबंधी
११	२४५ ते २६३	केंद्र व राज्य संबंधा संदर्भात
१२	२६४ ते ३०० अ	आर्थिक व वित्तिय बाबी संबंधी
१३	३०१ ते ३०७	देशांतर्गत व्यापार व उद्योगधंद्या संबंधी
१४	३०८ ते ३२३	वैधानिक सेवा
१४ अ	३२३ ते ३२३ ब	प्रशासकीय न्यायाधिकरणे
१५	३२४ ते ३२९	निवडणुका संबंधी
१६	३३० ते ३४२	वर्गीकृत जाती-जमाती विषयी विशेष तरतूदी
१७	३४३ ते ३५१	अधिकृत भाषा
१८	३५२ ते ३६०	आणीबाणी संबंधी
१९	३६१ ते ३६७	राष्ट्रपती, उपराष्ट्रपती याबाबीत विशेष तरतूदी
२०	३६८	राज्यघटना दुरुस्ती संबंधी
२१	३६९ ते ३९२	तात्पुरत्या व विशेष तरतूदी
२२	३९३ ते ३९५	घटना स्वीकृती, परिसमाप्ती[६]

- **राज्यघटनेतील परिशिष्टे-**

राज्यघटनेत १० परिशिष्टे आहेत. त्यांचा परिशिष्टानुक्रमे गोषवारा संक्षिप्तपणे पुढील प्रमाणे देता येईल-

१) पहिल्या परिशिष्टात देशातील सर्व घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेशांची यादी तसेच त्यांच्या भौगोलिक सीमांच्या मर्यादा संबंधी माहिती आहे.

२) दुसऱ्या परिशिष्टात पाच भाग आहेत. राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सभापती, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, संघराज्याचा महान्यायवादी यांची नेमणूक, त्यांचे पगार संबंधी माहिती आहे.

३) परिशिष्ट तिसरे- शपथ घेण्याचा मजकूर या परिशिष्टात आहे.

४) परिशिष्ट चौथ्यात राज्यसभेतील जागांची राज्यवार, केंद्रशासित प्रदेशावार संख्या देण्यात आलेली आहे.

५) पाचव्या परिशिष्टात वर्गीकृत क्षेत्रांचे नियंत्रण व प्रशासन संबंधी माहिती आहे.

६) सहाव्या परिशिष्टात आसाम, मेघालय, मिझोराम या राज्यातील आदिवासी विभागाच्या प्रशासनासंबंधी माहिती आहे.

७) परिशिष्ट सातवे- या परिशिष्टात केंद्र, राज्य व सामाजिक सूचीतील सर्व विषयांची यादी आहे.

८) परिशिष्ट आठवे- या परिशिष्टात घटनेने मान्य केलेल्या भाषा संबंधी माहिती आहे.

९) परिशिष्ट नववे- या परिशिष्टात राज्यघटनेने १९५१ साली पहिली दुरुस्ती करण्यात आली, त्यानुसार संघराज्यातील दिवाणी न्यायालयाच्या कक्षेबाहेरील कायद्यांची सूची आहे.

१०) परिशिष्ट दहावे- या परिशिष्टात पक्षांतर बंदी कायद्याचा समावेश आहे

- **राज्य घटनेतील नागरिकांचे मूलभूत हक्क-**

अ. क्र.	हक्क	राज्यघटना कलम क्रमांक
१	सर्वसाधारण हक्क	१२ व १३ कलम
२	समतेचा हक्क	१४ ते १८ कलम
३	स्वातंत्र्याचा हक्क	१९ ते २२ कलम
४	पिळवणुकीविरुद्ध तक्रार करण्याचा हक्क	२३ ते २४ कलम
५	धर्म स्वातंत्र्याचा हक्क	२५ ते २८ कलम
६	सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क	२९ ते ३० कलम
७	मालमत्तेचा हक्क	३१ अ ब क कलम
८	घटनात्मक संरक्षणाची हमी	३२ ते ३५ कलम

- **नागरिकांचे मूलभूत कर्तव्य-**

१९७६ सालच्या ४२ व्या घटनादुरुस्तीने सांगितले की, नागरिकांची कर्तव्य पुढील प्रमाणे आहेत

१) घटनेस अनुसरून वर्तन करणे. घटनेतील उद्दिष्टांचा मान राखणे.

२) आपल्या स्वातंत्र्याच्या चळवळीस प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे स्मरण ठेवणे.

३) भारताची राष्ट्रीय एकात्मता व प्रादेशिक अखंडत्वाचे रक्षण करणे.

४) देशाचे रक्षण करणे, संकटप्रसंगी देशाची सेवा करणे.

५) धार्मिक, प्रादेशिक, भाषिक भेदांना दुय्यम ठरवत राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे.

६) महिलांचा मान व सन्मान करणे. त्यांच्याविषयी विघातक कृत्य न करणे.

- **भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये-**

१) **संविधानाचा सरनामा-** भारतीय संविधानाचा (राज्यघटनेचा) सरनामा वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यात नागरिकांच्या कल्याणाची ग्वाही दिलेली आहे.

२) **धर्मनिरपेक्षता-** भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. कोणताही धर्म हा राष्ट्राचा धार्मिक मुलाधार असणार नाही. समाजातील सर्व घटकांना मर्जीप्रमाणे कोणत्याही धर्माचे आचरण करण्याचे स्वातंत्र्य असेल. परंतु तसे करतांना इतरांना त्रास होणार नाही, त्यांच्या अधिकारास बाधा येणार नाही याची काळजी घेतली आहे.

३) **मूलभूत हक्क-** संविधानानुसार नागरिकांचे विविध प्रकारचे मूलभूत हक्क मान्य करून त्यांनी त्यांची यादी दिलेली आहे.

४) **हक्कांचे संरक्षण-** नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी उच्च व सर्वोच्च न्यायालयावर सोपविण्यात आलेली आहे.

५) **मार्गदर्शक तत्वे-** संघराज्याच्या संविधानात कल्याणकारी राज्य ही संकल्पना स्वीकारली आहे. ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी राज्यघटनेत मार्गदर्शक तत्वे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

६) **संघराज्य पद्धतीचे शासन-** भारतीय राज्यघटनेनुसार भारतासाठी संघराज्य पद्धती मान्य केलेली आहे. संघराज्यात २८ घटक राज्य व ७ संघराज्य (केंद्रशासित) प्रदेश आहेत. त्यांचे मिळून संघराज्य बनलेले आहे.

७) **विषय सूची-** संघराज्याचा कारभारासाठी विविध विषयांची संघसूची जाहीर केलेली आहे. त्यानुसार केंद्र राज्य व सामायिक अशी तीन भागात विषयाची वाटणी केलेली आहे.

८) **संसदीय शासन पद्धती-** राज्यघटनेनुसार भारतीय संघराज्याचा कारभार चालवण्यासाठी संसदीय शासन पद्धतीचा स्वीकार केलेला आहे.

९) **इतर वैशिष्ट्ये-** लोकांचे सार्वभौमत्व, लिखित राज्यघटना, प्रौढमताधिकार, न्यायालयाचे श्रेष्ठत्व, एकेरी नागरिकत्व, मागास व वन्य जमातीच्या विकासासाठी सवलती इ. महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

म्हणून भारतीय राज्यघटना स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे.[८]

- **घटना दुरुस्त्या-**

भारतीय राज्यघटनेत ३६८ व्या कलमानुसार आवश्यकतेप्रमाणे दुरुस्ती करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे, म्हणूनच भारतीय राज्यघटनेत १९५१ ते २००० पर्यंत ८० वेळा दुरुस्ती करण्यात आलेली आहे. १९५१ साली पहिली घटना दुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार व्यक्ती स्वातंत्र्यावरील बंधनात वाढ करण्यात आली.

दीडशे वर्षाच्या लढयानंतर १९४७ साली भारत देश स्वतंत्र झाला. या लढयाच्या शेवटच्या टप्प्यात महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारताच्या भावी वाटचालीबद्दल विचार विनिमय झाला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतःची अलौकिक प्रतिभा, व्यासंग आणि सामाजिक न्यायाबद्दलच्या आंतरिक कळवळयातून भारतीय संविधान शब्दबद्ध केले.

"आम्ही भारताचे लोक...." अशी सुरुवात करीत, भारतीयांनी निवडलेल्या संविधान सभेने २६ नोव्हेंबर १९४९ रोजी "भारतीय संविधान" अधिग्रहीत आणि स्वीकृत केले. २६ जानेवारी १९५० पासून भारतीय प्रजासत्ताकात हे संविधान

लागू झाले. सर्व जाती धर्माच्या भारतीय स्त्री-पुरुषांना सन्मानाने आणि प्रतिष्ठेने जगण्याची हमी आणि विकासाची संधी देणाऱ्या व्यवस्थेचे जे स्वप्न भारतीय संविधानाने दाखवलेले होते, त्या दिशेने वाटचाल करण्याचा निर्धार केला.[९]



भारताचे संविधान

प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक,
भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य
घडवण्याचा व त्यांच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता,
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;
आमच्या संविधान सभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत: प्रत अर्पण करीत आहोत.

भारतीयांनी भारतीयांसाठी बनवलेले व एकमेकांच्या माणूसपणाला आम्ही माणूस म्हणून विकास साधण्याच्या अधिकाराला मान्यता देणारे भारतीय संविधान "ग्रंथम वाक्यम प्रमाणम" या न्यायाने अपरिवर्तनीय तर नाहीच त्याचबरोबर अपौरुषेयसुद्धा नाही. आपल्यापैकी काहीजण आपापल्या धर्मग्रंथावर विश्वास ठेवतात, श्रद्धा बाळगतात. सर्व धर्मग्रंथ प्रत्यक्षात मात्र पुरुषांनी लिहिलेले असल्याने एक जात सर्व धर्मग्रंथांनी महिलांवर अन्याय केलेले आहे. धर्माचे पुढारी आपापले धर्मग्रंथ कोणाही मर्त्य मानवाने लिहिलेले नसून परमेश्वरी मुखातून वदले गेले आहेत, असा दावा

करतात. त्यामुळे सर्व धर्मग्रंथ अपौरुषेय आणि म्हणूनच अपरिवर्तनीय आहेत असे त्या धर्माच्या कट्टर अनुयायांचे म्हणणे आहे.

भारतीय संविधान मात्र भारतीयांनी निवडलेल्या २९६ प्रतिनिधींनी बनवलेले आहे, आणि भविष्यातील भारतीयांच्या बदलत्या अडचणी व प्रश्नांना तोंड देण्यासाठी संविधानात आवश्यक ते बदल करण्याची तरतूदही भारतीय संविधानात घटना दुरुस्तीच्या कलमाद्वारे ठेवली आहे. भारतीय संविधानाने भारतीयांना बहाल केलेले अधिकार सुद्धा परमेश्वराने कृपाळूपणे अथवा राजाने मेहरबानी म्हणून दिलेले नसून भारतीयांनी भारतीयांना दिलेली ती मान्यता आहे.

सर्व भारतीय व्यक्तींना स्वतःच्या मर्जीप्रमाणे उपासनेचा अधिकार देणारे भारतीय संविधान. त्याच उपासना स्वातंत्र्याला सार्वजनिक शांतता, नीतिमत्ता आणि सार्वजनिक आरोग्य यांना बाधा न पोहोचविण्याचे बंधन घालते. अशी बाधा पोहोचवत असेल तर संबंधित धार्मिक रिती रिवाज आणि कर्मकांड यात हस्तक्षेप करण्याचा अधिकार राज्यव्यवस्थेला देणारे भारतीय संविधान युरोपातील प्रबोधन युगातील पोप आणि राजा यांनी एकमेकांच्या क्षेत्रात हस्तक्षेप करू नये या संकल्पनेच्याही पुढे एक पाऊल टाकते.[१०]

अलीकडील काळात लोकांनी निधर्मी समाज, सर्वधर्म समभाव, इहवाद असे सर्व प्रकारचे शब्द एकाच अर्थाने वापरून या सर्वच शब्दांना अर्थहीन केले गेले आहे. त्यामुळेच धर्मनिरपेक्षता या शब्दाच्या अर्थाबद्दल कमालीचा गोंधळ विचारवंतांच्याही मनात दिसतो. भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षतेची संकल्पना माझ्या दृष्टीने फारच महत्त्वाची आहे. उपासना स्वातंत्र्याचा अधिकार व्यक्तीला देताना ती व्यक्ती ज्या धर्मात जन्माला आला आली त्याशिवाय अन्य धर्माची तत्वे तिला पटल्यास त्या दुसऱ्या धर्माच्या तत्त्वाप्रमाणे उपासनेचा अधिकार बजावू शकते किंवा अस्तित्वात असलेल्या कुठल्याच धर्माची तत्वे पसंत न पडल्यास मला धर्माची गरज नाही असे तो म्हणू शकते.

संविधानाने दिलेले उपासना स्वातंत्र्य व्यक्तिला आहे परंतु धर्म नावाच्या संस्थेला नाही हे विशेष. हे उपासना स्वातंत्र्यसुद्धा इतरांच्या मूलभूत अधिकाऱ्यांना अडचण येणार नाही, अशा पद्धतीने वापरायचे आहे. अन्यथा त्यातही हस्तक्षेप करण्याचा अधिकार राज्यव्यवस्थेला आहे. एक प्रकारे घरात तुम्ही आपल्या धर्मग्रंथाला जरूर महत्त्व द्या, परंतु रस्त्यावर मात्र संविधानाचीच सत्ता चालेल अशी ही कल्पना आहे. भारतीय समाजात शांतता राहायची असेल व विकासाच्या दिशेने राष्ट्राला उत्तरोत्तर प्रगती करायची असेल तर ही संकल्पना प्रत्येक भारतीयाने समजून घेणे आणि आचरणात आणणे अति आवश्यक आहे.[११]

१९४९ नंतरचा भारतातील बदल-

महात्मा ज्योतिबा फुले हे बाळासाहेबांचे गुरु होते. घरातील चौदावे रत्न होते. समुद्रमंथनातून १४ रत्न निर्माण झाले तसे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे रत्न होते. बालपण, शिक्षण, नोकरी, हक्क, अधिकार, विवाह, घटस्फोट, अधिकार कायदा व हक्क अधिकार महिलांना मिळवून दिले आहेत. प्रामुख्याने नोटांवरील मूल्यांचा अर्थ मौलिक आहे, तो समजून घेणे. भारतीय संविधान हे प्रत्येक नागरिकांनी समजावून घेणे यासाठी यावर्षी वाचन, लेखन, वकृत्व स्पर्धा, फेरी, रॅली, मॅरेथॉन स्पर्धा, ऑनलाइन वकृत्व स्पर्धांतून प्रचार व प्रसार करण्याचा प्रयत्न केला आहे.

महिलांनी तर त्यांच्या जीवनात ग्रामपंचायत सदस्य, सरपंच ते पंतप्रधान, सरपंच ते राष्ट्रपती पदापर्यंत त्यांनी संविधानाचा उपयोग केला आहे. त्यात प्रामुख्याने स्वातंत्र्याच्या चळवळीतही महिलांनी सहभाग घेतला होता. भूमिगत चळवळ, १९४२ चा लढा, कस्तुरबा गांधी, सरोजिनी नायडू, इंदिरा गांधी, सुषमा स्वराज, प्रतिभा देवीसिंग पाटील, द्रौपदी मुर्मू, प्रियंका गांधी या विविध क्षेत्रात महिलांनी संविधानाचा आपल्या जीवनात देशासाठी उपयोग केला हे दिसते.

यासाठी आज भारतीय संविधान खेडयातुन तालुका, तालुका ते जिल्हा, जिल्ह्यातुन राजधानी, राज्य आणि संपूर्ण भारतातील भारतीय लोकांनी याचा उपयोग करून घेतला पाहिजे. तरच देशाची प्रगती होऊ शकेल. संविधानमय जग होऊ शकेल.

जय भारत!!! जय संविधान!!!

- **संदर्भ ग्रंथ यादी-**

१) भारतीय संविधानाची तोंड ओळख (भारताचे संविधान) : ले. पन्नालाल सुराणा. प्रकाशक- राष्ट्रसेवा दल. २६/११/२०१० (संविधान स्वीकृती दिन)

२) आधुनिक भारताचा इतिहास (१७६५ ते १९८४) : ले. प्रा गफुर शेख. प्रकाशक- प्रितम पब्लिकेशन्स, जळगाव.
प्रथमावृत्ती जून २००५.

३) आधुनिक भारत (१८५७ ते १९५०) : ले. डॉ. एस. एस. गाठाळ. प्रकाशक- के. एस. पब्लिकेशन्स, पुणे. प्रथमावृत्ती जुलै २०१४

- **तळटिपा-**

१) आधुनिक भारताचा इतिहास (१७६५ ते १९८४) : ले. प्रा गफुर शेख. प्रकाशक- प्रितम पब्लिकेशन्स, जळगाव.
प्रथमावृत्ती जून २००५. पृ. क्र. ३२६

२) आधुनिक भारताचा इतिहास : कित्ता पृ. क्र. ३२६

३) आधुनिक भारताचा इतिहास : कित्ता पृ. क्र. ३२६

४) आधुनिक भारताचा इतिहास : कित्ता पृ. क्र. ३२६, ३२७

५) आधुनिक भारताचा इतिहास : कित्ता पृ. क्र. ३२७

६) आधुनिक भारताचा इतिहास : कित्ता पृ. क्र. ३२८


७) आधुनिक भारताचा इतिहास : कित्ता पृ. क्र. ३२९

८) आधुनिक भारताचा इतिहास : कित्ता पृ. क्र. ३३०, ३३१


९) भारताचे संविधान : भारतीय संविधानाची तोंड ओळख- ले. पन्नालाल सुराणा. प्रकाशक- राष्ट्रसेवा दल. साने गुरुजी स्मारक, पुणे २६/११/२०१०. प्रस्तावना- सुभाष वारे.

१०) भारताचे संविधान – कित्ता - प्रस्तावना- सुभाष वारे.

११) भारताचे संविधान – कित्ता - प्रस्तावना- सुभाष वारे.


भारत
का
संविधान











ISARA INSTITUTE OF MANAGEMENT & PROFESSIONAL STUDIES

WWW.IIMPS.IN

EARN YOUR

MBA



Accreditation & Ranking

UGC / NCTE Approved.

INFO@IIMPS.IN

011-41005174

RESEARCH GATEWAY

STOP PLAGIARISM

1 Submit your content in Word File.

2 Get report in 48 hrs.

3 *Missing content or references will be fixed.

4 Citation for your work.

5 Get accurate user friendly report.

researchgateway.in | info@researchgateway.in

+91-9205579779

AROGYAM ONLINE

Arogyam Ayurveda

Holistic Healing through herbs

100% NATURAL

PARIVARTAN PSYCHOLOGY CENTER

COLOR PSYCHOLOGY : HOW COLOR AFFECT YOUR CHILD

BLUE — Calms your Child's Mind & Body

YELLOW — Promotes Concentration, Stimulates the Memory

PINK — Evokes Empathy, makes your Child Calm

RED — Excites and energizes your Child's body

GREEN — Improves Reading speed and Comprehension

www.parivartan4u.com

Confuse about your children's future?

भारतीय भाषा, शिक्षा, साहित्य एवं शोध

ISSN 2321 – 9726

WWW.BHARTIYASHODH.COM

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SCIENCE & TECHNOLOGY

ISSN – 2250 – 1959 (0) 2348 – 9367 (P)

WWW.IRJMST.COM

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF COMMERCE, ARTS AND SCIENCE

ISSN 2319 – 9202

WWW.CASIRJ.COM

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT SOCIOLOGY & HUMANITIES

ISSN 2277 – 9809 (0) 2348 - 9359 (P)

WWW.IRJMSH.COM

INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF SCIENCE ENGINEERING AND TECHNOLOGY

ISSN 2454-3195 (online)

WWW.RJSET.COM

INTEGRATED RESEARCH JOURNAL OF MANAGEMENT, SCIENCE AND INNOVATION

ISSN 2582-5445

WWW.IRJMSI.COM

JOURNAL OF LEGAL STUDIES,POLITICS AND ECONOMICS RESEARCH

WWW.JLPER.COM